# पश्चिम रेल्वेवर पाणी तुंबणारी सात ठिकाणे

## नाल्याची कामे २५ मे पर्यंत पूर्ण करण्याचा प्रशासनाचा दावा

प्रतिनिधी, मुंबई

**पश्चिम रेल्वेकडून** पावसाळापूर्व तयारीच्या कामांना गती देण्यात येत आहे. यंदा पश्चिम रेल्वेवर मुंबईत पाणी तुंबणारी सात ठिकाणे असल्याचे निदर्शनास आले असून त्यानुसार उपाययोजना केल्या जात असल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आतापर्यंत ४० नाल्यांचे विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तर उर्वरित तीन नाल्यांचे काम २५ मेपर्यंत पूर्ण केले जाणार असल्याचे पश्चिम रेल्वेकडून सांगण्यात आले.



पावसाळ्यात लोकल गाड्यांमध्ये बिघाड होऊ नये यासाठी पश्चिम रेल्वेकडून उपाययोजना केल्या जात आहेत. लोकल गाड्यांची दुरुस्तीही केली जात आहे. तसेच डब्यांचे छत तपासले जातानाच इन्सुलेटरच्या सफाईचे कामही करण्यात येत आहे.

पावसाळ्यात लोकल गाड्या सुरळीत राहण्यासाठी पश्चिम रेल्वेकडून प्रत्येक वर्षी पावसाळापूर्व तयारी केली जाते.

नालेसफाई आणि रुंदीकरण, रेल्वे हद्दीत येणाऱ्या आणि धोकादायक ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटणे यासह अनेक कामे केली जातात. यावर्षीही पश्चिम रेल्वेने या कामांना सुरुवात केली आहे. यात पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची माहितीही घेतली असता अशी सात ठिकाणे असल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये ग्रँट रोड, एलिफिन्स्टन रोड, दादर, माटुंगा रोड ते माहिम यार्ड, वांद्रे ते खार, अंधेरी ते जोगेश्वरी आणि नालासोपारा ते विरार यांचा समावेश आहे. त्यानुसार उपाययोजना करण्यात येत या भागांत हाय पॉवर क्षमतेचे आणि पाणी उपसा करणारे १०० पंप मशिन बसविण्यात येणार आहेत.

नालेसफाईच्या कामांनाही गती देण्यात येत असल्याचे पश्चिम रेल्वेकडून सांगण्यात आले. रेल्वे हद्दीत असणाऱ्या काही नाल्यांची सफाई ही पालिकेकडून केली जात आहे. यामध्ये मिठी नदी, धारावी नाला, पोईसर नाला इत्यादींचा समावेश आहे. नालेसफाईसाठी मुंबई पालिका आणि रेल्वेकडून निरीक्षणही केले जात आहे. नाल्यांची विविध कामे २५ मे पर्यंत पूर्ण केली जातील, असा दावा पश्चिम रेल्वेकडून करण्यात आला आहे. काही ठिकाणी रेल्वे रुळांची उंची वाढविण्यात आली असून यामध्ये पाणी साचणाऱ्या सात ठिकाणांचाही समावेश आहे.

# चिखलोली धरणातील पाणी पिण्यास अयोग्य

प्रतिनिधी, अंबरनाथ

**चिखलोली धरणातील** पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याची धक्कादायक बाब शासकीय प्रयोगशाळेच्या अहवालात स्पष्ट झाली आहे. दूषित पाणी तपासणीच्या अहवालात धरणातील पाणी पिण्यायोग्य नसल्याची बाब उघड झाल्याने अंबरनाथकरांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.



चिखलोली धरणातील पाणी दूषित असल्याने ते पाणी नागरिकांना पिण्यासाठी देणे धोकादायक होते. त्यामुळे हे पाणी तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. या अहवालात धरणातील शेवाळामुळे हे पाणी दूषित झाले नसून, गंधकाचे अंश असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे धरणातील पाणी नागरिकांना पिण्यासाठी देणे अयोग्य असून, नागरिकांना एमआयडीसीकडून पाणी उपलब्ध करण्यासाठी वरिष्ठांकडे चर्चा करणार आहे.

– मनीषा पालांडे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

चिखलोली धरणातून अंबरनाथ पूर्व भागात पाणीपुरवठा होत असतो. या धरणातून दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा प्रकार आठवड्यापूर्वी समोर आला होता. गेल्या वर्षी या धरणात रसायनांचे पाणी सोडण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंबरनाथ नगरपालिका, एमआयडीसी आणि एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणी दौऱ्यात चिखलोली धरणातील पाण्यात कोणत्याही प्रकारचे रसायन नसल्याचा दावा एमआयडीसी आणि एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांनी केला होता. जलवाहिन्या फुटल्यानेच धरणात दूषित पाणी जात असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र या पाहणी दौऱ्यानंतर धरणातील पाणी तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. यानुसार शासकीय प्रयोगशाळेत केलेल्या दूषित पाणी तपासणीच्या अहवालात धरणातील पाणी पिण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी धनंजय पाटील यांना याबाबत विचारले असता, अद्याप आमच्याकडे अहवाल आला नाही, असे त्यांनी सांगितले.

# रहेजा कला महाविद्यालय विनाअनुदानित करण्याचा घाट?

## संस्थेकडून अनुदान बंद करण्याची मागणी

प्रतिनिधी, मुंबई

**महाविद्यालयाची प्रवेश** क्षमता कमी करण्याच्या मुद्द्यावरून गेल्या वर्षी वादात अडकलेले वांद्रे येथील रहेजा स्कूल ऑफ आर्ट यंदाही नव्या वादात अडकले आहे. शासनाकडून मिळणारे अनुदान बंद करण्याची मागणी संस्थेने केली असून विनाअनुदानित महाविद्यालय करून शुल्क वाढवण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचा आरोप शिक्षक, कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

वांद्रे येथील रहेजा स्कूल ऑफ आर्ट हे खासगी अनुदानित महाविद्यालय आहे. या महाविद्यालयांत उपयोजित कला आणि ललित कला या विषयांचे पदविका अभ्यासक्रम आहेत. सध्या या महाविद्यालयाची दोन्ही अभ्यासक्रमांची मिळून शंभर प्रवेश क्षमता आहे. अनुदान बंद करण्यात यावे असे पत्र संस्थेने शासनाला दिले आहे. अधिकचे शुल्क घेता यावे यासाठी हा घाट घालण्यात येत असल्याचा शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांचा आरोप आहे. गेल्या वर्षी प्रवेश क्षमता कमी करण्यावरून महाविद्यालय वादात सापडले होते.

### संस्था काय म्हणते?

याबाबत संस्थेचे सचिव अरविंद तिवारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र संस्थेने शासनाला दिलेल्या पत्रात अद्ययावत, कालानुरूप अभ्यासक्रम सुरू करता यावेत यासाठी महाविद्यालय विनाअनुदानित करण्याची मागणी केली आहे. 'संस्थेला महाविद्यालय अद्ययावत करायचे आहे. त्याचप्रमाणे संस्था अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषांनुसार अभ्यासक्रम चालवू इच्छिते. त्यामुळे एआयसीटीईचे अर्हता नसलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांच्या नियंत्रणाखालील इतर विद्यालयात समावून घ्यावे. संस्थेचे नियम ज्या कर्मचाऱ्यांना मान्य असतील त्यांनीच या विद्यालयात पुढे सेवा चालू ठेवावी अन्यथा त्यांनी कलासंचालकांमार्फत इतर कॉलेजात जाण्याचा मार्ग पत्कारावा,' अशा आशयाचे पत्र संस्थेने दिले आहे.

### महाविद्यालय विनाअनुदानित करून काय होणार?

सध्या महाविद्यालयाचे शुल्क हे पाच हजार रुपये आहे. इतर खासगी महाविद्यालयांमधील शुल्क हे १५ ते ३५ हजार रुपयांपर्यंत आहे. महाविद्यालय विनाअनुदानित झाल्यास शुल्क वाढू शकते. 'अनुदान बंद झाल्यास त्याचा फटका मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना बसेल, असे सुधाकर तांबोळी यांनी सांगितले.

# खात्यावरील रक्कम चोरण्यासाठी मजुराकडून साथीदाराची हत्या

खास प्रतिनिधी, मुंबई

**वांद्रे-कुर्ला** संकुलात बांधकाम मजूर म्हणून काम करणाऱ्या मनोज सिंगने (३२) एटीएम केंद्रातून पैसे काढणे, खात्यावर किती रक्कम जमा आहे हे पाहणे यासाठी साथीदाराची मदत घेतली. मनोजच्या खात्यावर ६५ हजार रुपये आहेत हे पाहिल्यावर साथीदाराचे डोळे फिरले. मनोजच्या डेबिट कार्डचा पिन नंबर माहीत होताच साथीदाराने मनोजची हत्या केली.

बीकेसी पोलिसांनी झारखंडहून शादाब अन्सारी ऊर्फ राहुल (२३) या मनोजच्या साथीदाराला अटक केल्यानंतर हत्येमागील हेतू उघड झाला. संकुलातील खासगी कंपन्यांनी हाती घेतलेल्या बांधकामाच्या ठिकाणी मनोज पर्यवेक्षक होता आणि मजुरीही करत होता. त्याच्या हाताखाली २० ते २५ मजूर होते. मनोज या सर्वांमध्ये कामाची विभागणी करायचा. दहावीपर्यंत शिक्षण झालेला शादाब मनोजच्या हाताखालचाच मजूर. पण जास्त शिकलेला शादाब मनोजच्या जवळचा होता. अशिक्षित असल्याने बँकेचे व्यवहार मनोज दुसऱ्याच्या मदतीने करायचा. दोन आठवड्यांपूर्वी बँकेत किती रक्कम जमा आहे, हे पाहण्यासाठी मनोज शादाबला सोबत घेऊन एटीएम केंद्रात गेला. त्याने शादाबच्या हाती कार्ड दिले आणि चार अंकी पिन नंबरही सांगितला. त्यानुसार शादाबने यंत्रावर प्रक्रिया करून खात्यावर ६५ हजार रुपये जमा आहेत हे सांगितले. त्याच दिवसापासून त्याने मनोजचे कार्ड चोरण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कार्ड मिळवण्यासाठी मनोजच्या हत्येचा विचार शादाबच्या मनात घोळू लागला. ४ मे रोजी मनोज एकटा असताना शादाबने सळीचे घाव घालून त्याची हत्या केली. अर्ध्या तासाने एका एटीएम केंद्रातून शादाबने दोनदा पैसे काढले. उपायुक्त अनिल कुंभारे, साहाय्यक आयुक्त अरुण माने, वरिष्ठ निरीक्षक कल्पना गाडेकर यांच्या मार्गदशनाखाली ही कारवाई करण्यात आली.

'लोकसत्ता मार्ग यशाचा' कार्यशाळा

# बारावीनंतरच्या 'करिअर'संधीवर चर्चा

प्रतिनिधी, मुंबई

**बारावीचे वर्ष** जवळ आल्यावर सगळ्यांनाच आपल्या करिअरची स्वप्ने पडू लागतात. कोणते करिअर निवडावे, तिथे कसे पोहोचावे हे प्रश्न डोक्यात घोंगावतात. कारण यातून होणारी निवडच आगामी आयुष्याला दिशा देणारी असते. याच मार्गावर विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक बनून येणार आहे, 'लोकसत्ता मार्ग यशाचा' ही करिअर कार्यशाळा. येत्या २४-२५ मे रोजी होणाऱ्या या कार्यशाळेमध्ये करिअरचे पर्याय, त्यातील तज्ज्ञ, त्यांचा अनुभव सारे काही जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे ही कार्यशाळा होत आहे.

करिअरचा ताण हाताळण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे. तर करिअर निवडीचा मोठा टप्पा पार करण्याविषयी बोलतील करिअर समुपदेशक विवेक वेलणकर. इंजिनीअरिंग, मेडिकल या क्षेत्रात अनेकांना जायचे असते. तिथल्या कामाच्या प्रत्यक्ष अनुभवाबद्दल सांगतील सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विजय सुरासे आणि प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. अमोल अन्नदाते. तर इंजिनीअरिंग क्षेत्रातील करिअर संधींविषयी बोलतील, या क्षेत्रातील ३० वर्षांहून जास्त अनुभव असणारे आणि पीएच.डी. मिळवलेले डॉ. जयंत पानसे.

यूपीएससी आणि एमपीएससी या देशातील सगळ्यात लोकप्रिय स्पर्धा परीक्षा. त्यांच्या तयारीचा कानमंत्र देतील याच परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी.

एमपीएससी उत्तीर्ण आणि सध्या नाशिक जिल्हापरिषदेचे प्रोबेशनरी डेप्युटी सीईओ अनिल नागने आणि यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन भारतीय संचार लेखा वित्त सेवेत काम करणारे मंदार देशपांडे विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

याचबरोबर करिअरच्या वेगळ्या वाटा या चर्चासत्रात बोलतील शेफ देवव्रत जातेगावकर, चित्रकलेतील करिअरविषयी बोलतील चित्रकार- समीक्षक महेंद्र दामले तर अभिनयातील करिअरविषयी बोलतील लेखक, दिग्दर्शक व अभिनेता अभिराम भडकमकर. या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेशिका घेणे आवश्यक आहे.

- टायटल पार्टनर - आयटीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स.
- असोसिएट पार्टनर - विद्यालंकार क्लासेस, झील अकादमी आणि संदीप युनिव्हर्सिटी.
- पॉवर्ड बाय पार्टनर - एड्युरशिया (ओव्हरसीज ॲडमिशन्स फॉर मेडिकल, इंजिनीअरिंग ॲण्ड एमबीए), गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन ॲण्ड डेव्हलपमेंट, के ११ अकॅडमी ऑफ फिटनेस सायन्स, कैझेन मल्टिमीडिया, संकल्प मेश्रामज द आर्ट ऑफ सिनेमा कोर्सेस, उत्क्रांती राइज ॲण्ड राइज, युक्ती इंजिनीअरिंग, मेडिकल ॲण्ड फाउंडेशन.

- प्रवेशिका १५ मेपासून खालील ठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत उपलब्ध :

१. रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई
२. लोकसत्ता कार्यालय, सातवा मजला, मफतलाल सेंटर, नरिमन पॉइंट, मुंबई
३. विद्यालंकार हाऊस, प्लॉट क्रमांक ५६, हिंदू कॉलनी, पहिली गल्ली, दादर (पूर्व)
४. झील अकादमी - अंधेरी, तळ मजला, उत्कर्ष बिल्डिंग, बाटा शॉपजवळ, अंधेरी पश्चिम स्थानकासमोर संपर्क : ८६५२७७९५९७.
५. झील अकादमी - गोरेगाव, क - १०१, सुमित समर्थ आर्केड, आरे रोडसमोर, जैन मंदिर, गोरेगाव (प) मुंबई, संपर्क : ८६५२७७८५५३.

- याचबरोबर या कार्यक्रमाची तिकीट खालील संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. https://www.townscript.com/e/loksatta-marga-yashacha-mumbai-234014 येथेही उपलब्ध होतील.

**FORCE MOTORS LIMITED**
CIN L34102PN1958PLC011172
Regd. Office : Mumbai-Pune Road, Akurdi, Pune - 411 035, INDIA.
FORCE

**NOTICE OF BOARD MEETING**

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and other applicable provisions, NOTICE IS HEREBY GIVEN THAT a meeting of the Board of Directors will be held on Tuesday, 29th May 2018, in Pune, to consider and approve, *inter alia*, the Audited Financial Results for the Quarter and Financial Year ended on 31st March 2018 and to recommend dividend, if any.

This intimation is also available on the website of the Company and the website of BSE Limited viz. **www.forcemotors.com** and **www.bseindia.com** respectively.

For Force Motors Limited
Sd/-
Kishore P. Shah
Company Secretary & Compliance Officer

Place : Pune
Date : 17th May 2018

**भारत सरकार**

**रसायने आणि खते मंत्रालय**

**रसायने आणि खनिज तेल विभाग**

**शेवटच्या दिनांकाचा विस्तार**

रसायने आणि खनिज तेल विभाग हे खालील पदांसाठी अर्ज मागवीत आहेत :

(i) **अतिरिक्त औद्योगिक सल्लागार :** स्तर १३ मधील १ पदाचे पे मॅट्रिक्स (रु. १,२३,१०० - २,१५,९००).
(ii) **संयुक्त औद्योगिक सल्लागार :** स्तर १२ मधील २ पदांचे पे मॅट्रिक्स (रु. ७८,८०० - २,०९,२००).
(iii) **उप औद्योगिक सल्लागार :** स्तर ११ मधील २ पदांचे पे मॅट्रिक्स (रु. ६७,७०० - २,०८,७००).

शैक्षणिक पात्रता, कामाचा तपशील, आवश्यक अनुभव इ.च्या माहितीसह असलेले तपशीलवार परिपत्रक विभागाच्या www.chemicals.nic.in या संकेतस्थळावर प्रत्येक कामाच्या समोर देण्यात आले आहे. विहित स्वरूपातील अर्ज योग्यप्रकारे ०१.०६.२०१८ पर्यंत खाली देण्यात आलेल्या पत्त्यावर पाठवण्यात यावे.

**डी. प्रवीण, संचालक (प्रशासन)**
**रसायने आणि खनिज तेल विभाग**
**खोली क्र. २३६-ए, ए-विंग, २ रा मजला,**
**शास्त्री भवन, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड,**
**नवी दिल्ली - ११०००१**

डीएव्हीपी ०२१०१/११/०००१/१८१९

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
जे.बी.बी.मार्ग, मुंबई : ४०० ००८
भांडार व खरेदी खाते

**ई-निविदा सूचना क्र. ०२ सन २०१८-१९**

महाव्यवस्थापक (भां व ख), म.रा.मा.प. महामंडळाच्या वतीने खालील वस्तुंच्या खरेदीसाठी ई-निविदा मागवत आहेत. निविदा वस्तु, खरेदीची मात्रा, विनिर्देश, निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम निविदाकारांची पूर्वपात्रता, इतर अटी व शर्ती- https://mahatenders.gov.in व https://www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदाकारांना निविदा भरण्यासाठी मे. NIC (National Informatics centre) २४ x ७ हेल्प डेस्क टोल फ्री दुरध्वनी क्र. १८००३०७०२२३२ अथवा भ्रमणध्वनी क्र.- +९१७८७८००७९७२, ७३, +९१७८७८१०७९८५/८६ या क्रमांकावर संपर्क साधण्याची विनंती करण्यात येत आहे.

**निविदा वस्तूंची यादी** : लॅपटॉप, फ्लायव्हील असेंब्ली ॲण्ड स्टार्टर रींग गिअर, रेकॉन इंजिन असेंब्ली (रिपेअरींग ऑफ लेलॅण्ड ॲण्ड टाटा इंजिनस्), हॅण्ड रेस्ट फॉर सीट, मल्टीग्रीप ॲल्युमिनियम ब्लाइण्ड रीवेट, वेब टाईप ड्राईव्हर सीटस् फॉर टाटा ॲण्ड लेलॅण्ड बसेस् रेनफोर्सड् अब्रेसिव्ह कटींग व्हील, रासपींग ब्लेड, नायलोप्लेट, कन्टीन्यूअस् कॉम्प्युटर ईझेडआर स्टेशनरी, पे बील फॉर्म फॉर डिव्हीजन इन मुंबई, पीव्हीसी इन्सुलेटेड केबल, कनडक्टर टीकेट ट्रे (बीग ॲण्ड स्मॉल) ॲण्ड एम.एस. टिकेट ट्रंक, सी आय ४ प्लस इंजिन ऑईल.

या निविदा सुचनेतील निविदाबाबतची सर्व शुध्दीपत्रके, मुदतवाढ, कालबध्द कार्यालयातील बदल इत्यादी हे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत वर्तमानपत्र अथवा अन्य माध्यमात प्रसिध्दी करण्यात येणार नाही. निविदाकारांनी याची नोंद घेवून नियमीतपणे संकेतस्थळावर संपर्क साधावा. जे निविदाकार निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम अदा करण्याकरीता SB MOPS चा वापर करणार आहेत त्यांनी सदरची रक्कम चार दिवस आगाऊ भरणे आवश्यक आहे.

महाव्यवस्थापक (भां.व ख.) महामंडळाच्या वतीने कोणतीही निविदा पूर्णपणे अथवा अर्धवट स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

**महाव्यवस्थापक (भां.व ख.)**

**TATA**

**TATA STEEL LIMITED**

**Registered Office:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | १६,२८०.९४ | १५,५९५.७८ | १७,११३.१३ | ६०,५१९.३७ | ५३,२६०.९६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३,३६३.२७ | ३,२२६.२५ | २,६९७.०६ | १०,००४.५४ | ६,०६०.३१ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,७५५.८७ | २,११०.८० | २,२५५.०० | ६,६३८.२५ | ५,३५६.९३ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १,०३०.९३ | १,३३८.०९ | १,४१४.९६ | ४,१६९.५५ | ३,४४४.५५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | १,०४३.७९ | १,४७४.२० | १,४३८.५६ | ४,१०८.४३ | ४,१२०.३४ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४६.१२ | ९७१.४१ | ९७१.४१ | १,१४६.१२ | ९७१.४१ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | ६०,३६८.७२ | ४८,६८७.६० |
| नेट वर्थ | | | | ६३,७८९.८४ | ५१,९३४.०१ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १०,३४५.७९ | १०,१७५.७० |
| नेट डेब्ट इक्विटी रेशो | | | | ०.१५ | ०.४४ |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ९.३८ | १२.५५ | १३.३२ | ३८.५७ | ३१.७४ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९.३८ | १२.५५ | १३.३२ | ३८.५६ | ३१.७४ |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ५.७७ | २.७२ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ७.०८ | ४.२१ |

**३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३६,१३२.३० | ३३,४४६.६० | ३५,३०४.८९ | १३३,०१६.३७ | ११७,४१९.९४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३,८३९.३४ | ३,२१०.२८ | ४,३२७.८० | ११,५१०.६३ | ६,७९७.८६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १५,२१५.४८ | २,०९४.७० | २५९.२१ | २१,१०९.७५ | २,४७३.६३ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १४,६३९.४१ | १,१४३.८८ | (७१६.७५) | १७,७०४.३६ | (३०४.३८) |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ४८.६१ | (७.९६) | (४५१.२७) | ५८.४५ | (३,८६४.१९) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | १९,१९७.१९ | १,३२५.०१ | २२४.६० | १४,६८४.८० | (४,७३१.६३) |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४४.९५ | ९७०.२४ | ९७०.२४ | १,१४४.९५ | ९७०.२४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | ५८,३८७.१९ | ३६,१७५.७८ |
| नेट वर्थ | | | | ६१,८०७.१४ | ३९,४२१.०२ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९६.४० | १२.१५ | (७.४६) | १२७.५६ | (५.३५) |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९६.३८ | १२.१५ | (७.४६) | १२७.५४ | (५.३५) |
| प्रति भाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९६.८६ | १२.०७ | (११.८४) | १२८.१२ | (४२.८९) |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९६.८४ | १२.०७ | (११.८४) | १२८.१० | (४२.८९) |

**टीपा :**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) सेबी (लिस्टींग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२(४) च्या पोट-खंड (ए), (बी), (डी) व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी संबंधित आवश्यक माहिती एनएसई व बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) यांच्याकडे दिली आहे आणि ती युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

सी) ०१ जुलै, २०१७ पासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यानंतर प्रवर्तनातून महसुलाची माहिती जीएसटीच्या निव्वळ दिली आहे. त्यानुसार ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी प्रवर्तनातून महसूल आणि इतर खर्च निष्कर्षांत सादर केलेल्या मागील कालावधीशी तुलनायोग्य नाही.

**टी. व्ही. नरेंद्रन**
**मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक**
**मुंबई : १६ मे, २०१८**

**कौशिक चॅटर्जी**
**कार्यकारी संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी**

**TATA STEEL**